सत्यमेव जयते

# राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे
## महाराष्ट्र राज्य

| | | |
|---|---|---|
| अतिरिक्त संचालक<br>दुरध्वनी क्रमांक (वै)<br>दुरध्वनी क्रमांक (का) | २६०५८९९६ (वै)<br>२६०५८७३९ (का)<br>२६०५८१३९ (का)<br>२६०५८४७६ (का) | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण,<br>माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, कुटुंब कल्याण भवन, राजा बहादूर मिल रोड, पुणे रेल्वे स्टेशन मागे, पुणे § ४११००१, दुरध्वनी§ ०२० § २६०५८२१८, २६०५८१०९<br>Email – spm.pune1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.राकुकका/बाल आरोग्य- १५क/ आयडीमीएफ २०२१/ मागदर्शक सूचना/ /२०२१ 41662-765<br>दि.02/७/२०२१ |

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,............(सर्व.)
२) जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,..........(सर्व)
३) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका,............(सर्व)
४) कार्यकारी आरोग्य अधिकारी, महानगरपालिका......... वृहन्मुंबई

**विषय :- अतिसार नियंत्रण पंधरवडा (Intensified Diarrhea Control Fortnight)राबविण्याबाबत.**

**संदर्भ :- १) केंद्रशासनाचे जाक्र. NO-Z-28020/75/2021-CH दिनांक ०७ जून, २०२१ रोजीचे पत्र**
**२) मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राआअ मुंबई यांचे जाक्र न. SHSM/Ongoing activities NHM Prog. 20-21/117242-447 dated 24 march 2021 रोजीचे पत्र**

उपरोक्त विषयान्वये अर्भक मृत्यूदर व बाल मृत्यूदर कमी करणे हे राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे एक महत्वाचे उदि्दष्ट आहे. देशात ५ वर्षापर्यंतच्या बालकांच्या मृत्यूमागे अतिसार हे प्रमुख कारण असून १०% बालके अतिसारामुळे दगावतात आणि हया बालमृत्यूचे प्रमाण उन्हाळयात व पावसाळयात जास्त असते. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू शून्य करणे हे उदि्दष्ट समोर ठेवून राज्यात दिनांक १५ जुलै ते ३० जुलै २०२१ या कालावधीत **"विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा"** राबविण्याचे ठरविले आहे.

**"विशेष अतिसार नियंत्रण पंधरवडा राबविण्याचे उद्देश :**

- पालक आणि काळजी वाहकांमध्ये अतिसार तसेच कोवीड १९ आजाराच्या प्रतिबंध आणि व्यवस्थापन विषयक योग्य वर्तणूक बिंबवणे.
- अतिसार असलेल्या बालकांमध्ये ओआरएस आणि झिंकच्या वापराबाबतचे प्रमाण जास्तीत जास्त होईल याची सुनिश्चिती करणे.
- सामाजिक व आरोग्य संस्था स्तरावर बालकांमधील अतिसाराच्या रुग्णांचे व्यवस्थापन हे स्टॅंडर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल नुसार होत असल्याबाबतची खात्री करणे.

Scanned with CamScanner

या उपक्रमात जनजागृती, अतिसारामध्ये घ्यावयाची काळजी, ओआरएस व झिंक गोळया यांचा वापर कसा करावयाचा याची प्रात्यक्षिके, आशाद्वारे ओआरएस झिंक या गोळयांचे घरोघरी वाटप, आरोग्य संस्थांमध्ये ओआरएस व झिंक कोपरा स्थापन करणे व अतिसार झालेल्या बालकांचा शोध घेणे व त्यांचे उपचार, प्रचार प्रसिध्दी,इत्यादी कृती करण्यात याव्यात. त्या अनुषंगाने जिल्हयातील ओआरएस पाकीटे व झिंक गोळया सामाजिक व आरोग्य संस्थास्तरावर उपलब्ध असल्याची खात्री करावी. उपक्रमासाठीच्या आर्थिक मार्गदर्शक सूचना पुढील प्रमाणे -

## आर्थिक मार्गदर्शक सूचना :-

- **आशा करिता मानधन :-** घरोघरी ओआरएस पाकिटांचे वाटप करण्यासाठी आशा कार्यकर्तीला १ रु. प्रती ओ.आर.एस. पॅकेट (१०० पाकिट प्रती आशा) मानधन देण्यात येणार आहे. या बाबींवर होणारा खर्च ३.१.१.१.७ या एफएमआरकोड अंतर्गत नोंदवावा. गावातील लाभार्थ्यांची संख्या १०० पेक्षा कमी असल्यास ही आशाला पूर्ण रक्कम रु.१००/- अदा करण्यात यावेत.
- **कार्यक्रमाचे पर्यवेक्षण :-** कार्यक्रमाचे पर्यवेक्षण सुलभरित्या करण्यासाठी पंधरवडया दरम्यान प्रत्येक जिल्हयाला दोन वाहने खाजगी तत्वावर भाडयाने घेण्यासाठी मंजूर करण्यात आलेली आहेत. त्यासाठी प्रतिवाहन रु.१०००/- प्रति दिवस मंजूर करण्यात आले आहेत. तसेच इंधनसाठी प्रतिवाहन रु. १०००/- प्रतिदिवस मंजूर करण्यात आलेले आहेत. संपूर्ण कार्यक्रमासाठी १० दिवसासाठी हि वाहने वापरता येतील. प्रत्येक जिल्हयास यासाठी रु.४०,०००/- मंजूर करण्यात आलेले आहेत. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कार्यक्रमाचे पर्यवेक्षण करताना जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या कार्यक्षेत्रातील पंधरवडा कार्यक्रमाचे पर्यवेक्षण होईल याची खबरदारी घ्यावी.या बाबींवर होणारा खर्च १६.१.५.३.१ या एफएमआरकोड वर नोंदवावा.

विहित नमुने व प्रसिध्दि साहित्याच्या छपाईसाठी विशेष आर्थिक मार्गदर्शक सूचना कालांतराने निर्गमित करण्यात येतील.

सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये दि.१० ऑगस्ट २०२१ अखेर पर्यंत spm.pune1@gmail.com या ईमेल आयडीवर अहवाल पाठवावा.

**सहपत्र-**

- मार्गदर्शक सूचना
- विहित नमुना
- वेळापत्रक
- उपचार तक्ता - योजना अ, ब आणि क

**अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा,**
**कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे.**



Scanned with CamScanner

**प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी :-**

उपसंचालक, आरोग्य सेवा, मंडळ ..... सर्व.

२/- आपल्या मंडळातील जिल्ह्यांमध्ये उपरोक्त सूचनाचे या कार्यक्रमाची अंमलबजावणी होण्यासाठी पाठपुरावा करावा.



Scanned with CamScanner

# अतिसार नियंत्रण पंधरवडा राबविण्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना
# १५ जुलै ते ३० जुलै २०२१

**उद्देश :**

- पालक आणि काळजी वाहकांमध्ये अतिसार तसेच कोवीड १९ आजाराच्या प्रतिबंध आणि व्यवस्थापन विषयक योग्य वर्तणूक बिंबवणे.
- अतिसार असलेल्या बालकांमध्ये ओआरएस आणि झिंकच्या वापराबाबतचे प्रमाण जास्तीत जास्त होईल याची सुनिश्चिती करणे.
- सामाजिक व आरोग्य संस्था स्तरावर बालकांमधील अतिसाराच्या रुग्णांचे व्यवस्थापन हे स्टँडर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल नुसार होत असल्याबाबतची खात्री करणे.

**धोरण :**

- पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या बालकांच्या घरात ओआरएस व झिंक चा वापर तसेच उपलब्धता वाढवणे.
- अतिसारासह जलशुष्कता असलेल्या बाल रुग्णांचे व्यवस्थापन करण्यासाठी आरोग्य संस्थांचे बळकटीकरण करणे.
- कोवीड १९ सारख्या इतर संसर्गजन्य आजाराच्या साथी दरम्यान अतिसाराचा प्रतिबंध व नियंत्रण करण्याकरिता त्याविषयी प्रचार, प्रसार व संवाद या बाबींवर भर देण्यात यावा.
- शहरी झोपडपट्टया, पूरग्रस्त भाग, आरोग्य सेविका कार्यरत नसलेली उपकेंद्रे, भटक्या जमाती, वीट भट्टी कामगार, स्थलांतरीत मजूर आणि बेघर मुले इत्यादी यासारख्या जोखीमग्रस्त घटकांवर विशेष लक्ष देण्यात यावे.

## जिल्हास्तरीय सुकाणू समितीची स्थापना करणे:-

या कार्यक्रमाच्या व्यवस्थापन व अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात यावी.या कार्यक्रमामध्ये आरोग्य विभागाबरोबरच, महिला बाल विकास विभाग, शिक्षण व पाणी पुरवठा या विभागांचाही समावेश करण्यात यावा. तसेच आयएपी (IAP), आयएमपी (IMP) अशासकिय संस्था, जिल्हास्तरावरील युनिसेफ सल्लागार यांचा समावेश करावा. या समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी, जिल्हा कार्यालय. | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद. | उप अध्यक्ष |
| ३) | उप मुख्यकार्यकारी अधिकारी, बाल कल्याण विभाग, जिल्हा परिषद. | सदस्य |
| ३) | उपअभियंता अधिकारी, (Water & San/Village Panchyat) | सदस्य |



Scanned with CamScanner

४) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद. सदस्य
५) जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालये. सदस्य
६) वैद्यकिय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका. सदस्य
७) जिल्हा शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद. सदस्य
८) स्थानिक आयएमए, प्रतिनिधी. सदस्य
९) स्थानिक आयएपी, प्रतिनिधी. सदस्य
१०) जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी, जिल्हा परिषद. सदस्य
११) वैद्यकिय महाविद्यालय, विभाग प्रमुख , बालरोग सदस्य
१२) जिल्हा प्रजनन व बालआरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य सचिव

सदर अधिका-यांची समिती स्थापन करुन दि.६.७.२०२१ रोजी सभा आयोजित करण्यात यावी आणि कार्यक्रमाचा कृतीआराखडा तयार करण्यात यावा.

## तालुकास्तरीय सुकाणू समिती स्थापन करणे :-

अतिसार नियंत्रण पंधरवडा कार्यक्रम राबविण्यासाठी तालुकास्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात यावी. या कार्यक्रमामध्ये आरोग्य विभागाबरोबरच महिला बाल विकास, शिक्षण विभाग व पाणी पुरवठा या विभागांचाही समावेश करण्यात यावा.या समितीमध्ये खालील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा.

१) वैद्यकिय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय. अध्यक्ष
२) आरोग्य अधिकारी, नगरपालिका सदस्य
३) गट शिक्षण अधिकारी. सदस्य
४) ब्लॉक रिसोर्स सेंन्टर (BRC) चे प्रतिनिधी सदस्य
५) बाल विकास प्रकल्प अधिकारी सदस्य
६) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, (सर्व) सदस्य
७) तालुका आरोग्य अधिकारी. सदस्य सचिव

सदर अधिका-यांची समिती स्थापन करुन दि.७.७.२०२१ रोजी सभा आयोजित करण्यात यावी आणि कार्यक्रमाचा कृतीआराखडा तयार करण्यात यावा.



५

Scanned with CamScanner

## ओआरएस व झिंक साठयाचे वाटप

सर्वस्तरावर ओ.आर.एस. व झिंक गोळयांचा औषधी साठा पुरेसा प्रमाणात उपलब्ध असल्याची खात्री करावी. ज्या ठिकाणी ओआरएस व झिंक गोळया उपलब्ध नसतील त्या ठिकाणी त्वरीत व वेळेत साठा उपलब्ध करुन देण्यात यावा. ओआरएस व झिंक साठयाचे वाटप हे खालीलप्रमाणे करण्यात यावे.

**उदाहरणार्थ २० लाख लोकसंख्येसाठी खालीलप्रमाणे ओआरएस पाकिटे व झिंक लागेल.**

- ५ वर्षाखालील एकूण बालकांची संख्या :- २ लाख (१०%)
- २० लाख लोकसंख्या असेल तर त्यांना २ लाख (१० %) ओआरएसचे पाकिट घरोघरी वितरणासाठी आवश्यक आहेत. (एका बालकासाठी एक ओआरएस पाकिट या प्रमाणे)
- २० हजार (१%) ओआरएस पाकिटे आणि २ लाख ८० हजार झिंक गोळया (१४%) ओआरटी- झिंक कॉर्नरसाठी लागतील.
- आशा व एएनएमसाठी ६०,००० (३%) ओआरएसचे पाकिटे आणि ४,००,००० (२०%) झिंक गोळया लागतील (आवश्यकतेनुसार अतिसाराच्या उपचारासाठी पंधरवडयामध्ये वापरण्याकरीता कमीतकमी २० ओआरएसचे पाकिटे व १४० झिंक गोळया प्रत्येक आशा / एएनएमकडे असाव्यात).



Scanned with CamScanner

## तांत्रिक मार्गदर्शक सूचना :-

| सामाजिक स्तर | आरोग्य संस्थास्तर |
| --- | --- |
| **आशांमार्फत बालकांची यादी तयार करणे**<br>• अतिसार पंधरवडयामध्ये गृहभेटींचा सुक्ष्म कृती आराखडा आशांकडे उपलब्ध असावा. त्याप्रमाणे त्यांनी ५ वर्षाखालील बालकांची यादी तयार करुन पुढील कार्यक्रमाचे नियोजन करावे.<br>**कोवीड १९ संबंधित सुचना**<br>• टाळेबंदी दरम्यान आशा स्वयंसेविकेद्वारे प्रतिबंध नसलेल्या क्षेत्रात (Non-Containment Zone) पाच वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या बालकांच्या घरोघरी जाऊन ओआरएस च्या पाकिटाचे वाटप करावे. तसेच, संधी मिळाल्यास प्रतिबंधीत क्षेत्रात (Containment Zone) ओआरएस च्या पाकिटाचे वाटप करण्यात यावेत.<br>**गृहभेटी मार्फत ओआरएस पाकीटांचे वाटप**<br>• HBNC, HBYC अशा इतर कार्यक्रमांतर्गत आशा स्वयंसेविका व आरोग्य सेविका द्वारे देण्यात येणाऱ्या गृहभेटींदरम्यान कोवीड १९ प्रतिबंधात्मक सूचनांचे पालन करुन ओआरएस च्या पाकिटांचे वाटप करण्यात यावे.<br>• प्रत्येक आशाने आपल्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक घरी भेटी देऊन ५ वर्षाखालील प्रत्येक बालकासाठी प्रतिबंधात्मक स्वरुपात एका बालकास एक याप्रमाणे ओआरएस पाकिटचे वाटप करावे.<br>**समुपदेशन**<br>• भेटीदरम्यान ओआरएसच्या वापराविषयी समुपदेशन करावे. तसेच समुपदेशनासाठी एमसीपी कार्डचा वापर करावा.<br>• आशांनी सर्व कुटुंबीयांना निर्जंतुकीकरण व स्वच्छतेचे महत्व सांगावे. | अतिसाराच्या उपचारासाठी ओआरएस व झिंक कॉर्नर स्थापन करणे -<br>• ग्रामीण, शहरी, मनपा भागातील सर्व आरोग्य संस्थामध्ये बाह्य रुग्ण विभागात (ओपीडी) व आंतररुग्ण (आयपीडी) विभागातओआरएस आणि झिंक कॉर्नर स्थापन करुन कार्यान्वित करावेत. ओआरएस व झिंक कॉर्नर आणि ओपीडीमध्ये या विषयीचे सोबत जोडलेले ट्रिटमेंट प्रोटोकॉल (treament protocols) खालील संस्थांमध्ये लावावेत.<br>➢ वैद्यकिय महाविद्यालय<br>➢ जिल्हा रुग्णालय,<br>➢ प्राथमिक आरोग्य केंद्र<br>➢ उपकेंद्र<br>➢ हेल्थ पोस्ट/हेल्थ सेंटर.<br>➢ आरोग्य वर्धीनी केंद्र<br>• सदर कॉर्नरमध्ये ओआरएसची पाकिटे व झिंकच्या गोळया उपलब्ध ठेवाव्यात. तसेच ओआरएसचे द्रावण तयार करण्याचे प्रात्येक्षिक करण्यासाठी आवश्यक उपकरणे उदा. स्वच्छ पातेले, वाटी, चमचा, बघराळे असावेत.<br>• ओआरटी कॉर्नरच्या ठिकाणी तसेच ओपीडीमध्ये प्रसिध्दी साहित्य दर्शनी भागात लावावेत.<br>• सर्व संस्थांमध्ये ओआरएस व झिंकचा पुरेसा साठा असावा.<br>• अतिसार झालेल्या सॅम बालकांचा उपचार केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार करण्यासाठी पोषण पुनर्वसन केंद्राना सुसज्ज करावे.<br>• आयएमएनसीआय - प्लॅन सी च्या मार्गदर्शक |



Scanned with CamScanner

| सामाजिक स्तर | आरोग्य संस्थास्तर |
|---|---|
| • जे लाभार्थी संस्थेला भेट देऊ शकत नाहीत किंवा ज्यांना गृहभेट शक्य नाही अशा लाभार्थ्यांना दूरध्वनीद्वारे समुपदेशन करावे.<br>**प्रात्यक्षिक**<br>• दर दिवशी ४ ते ८ घरांमधील पालकांना ओआरएसचे द्रावण तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात यावे. तसेच प्रात्यक्षिके दाखविल्यानंतर पालकांना सर्व माहिती समजल्याची खात्री करावी.<br>**उपचार**<br>• आशांनी अतिसाराचे रुग्ण ओळखून योजना अ प्रमाणे उपचार करावा.<br>**संदर्भ सेवा**<br>• आशांनी अतिसाराचे रुग्ण ओळखून त्यांना आरोग्य संस्थेमध्ये संदर्भित करावे आणि मातांना धोक्याच्या लक्षणांबाबत सूचित करावे.<br>• अतिसार नियंत्रण पंधरवडया दरम्यान अतिसारामुळे झालेल्या बालमृत्यूबाबतची माहिती आशांनी वरिष्ठांना दयावी.<br>• दुर्गम भाग, झोपडपट्टी, दुर्लक्षित, पुरग्रस्त व जोखीमग्रस्त भागातील बालकांवर प्राधान्याने लक्ष केंद्रीत करावे. (उदा. वीट भट्टी, ऊसतोडी इत्यादी)<br>**गृहभेट**<br>• आशांनी या पंधरवडयामध्ये एका गावामधील ५ वर्षाखालील बालके असलेली १०० ते १३० घरांना भेटी दयावयाच्या आहेत म्हणजे १ दिवसामध्ये साधरणतः १० बालकांच्या भेटी होतील.<br>**सहाय्यक पर्यवेक्षण**<br>• गाव पातळीवरील कार्यक्रमाचे सनियंत्रण एएनएम ने करावे. | सूचनानुसार तीव्र जलशुष्कता झालेल्या बालकांचे व्यवस्थापन करण्यात यावे.<br>• अतिसाराच्या उपचाराच्या योग्य पध्दतीनुसार बालरुग्ण विभाग व बाहय रुग्ण विभागामध्ये प्रोटोकॉल व पोस्टर्स प्रदर्शित करावेत.<br>• लहान बालकांमधील अतिसाराच्या व्यवस्थापनेसाठी ओआरएस सोबत झिंक देण्यासाठी सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे. |



Scanned with CamScanner

## अतिसार व्यवस्थापनासोबत स्वच्छतेविषयी एएनएमचे कार्य :-

- अतिसार पंधरवडया अंतर्गत एएनएमने तिच्या उपकेंद्रामध्ये आणि ग्राम आरोग्य पोषणदिनी मातांना व काळजीवाहकांना विशेषतः ५ वर्षाखालील बालकांच्या मातांना अतिसाराचा प्रतिबंध आणि व्यवस्थापन विषयी माहिती देण्यात यावी.
- एएनएमने अतिसार पंधरवडयाचे मुख्य घटक, अतिसारामध्ये ओआरएस व झिंकचे महत्व, स्तनपान सुरु ठेवणे, अतिसाराच्या प्रतिबंधासाठी हातांच्या स्वच्छतेचे महत्व आणि शौचाची विल्हेवाट लावण्यासाठी शैचालयाचा वापर या विषयी महत्वाचे संदेश दयावेत. तसेच बालकांमधील धोक्याच्या लक्षणांबाबतही माहिती दयावी.समुपदेशनासाठी एमसीपी कार्डचा वापर करावा.
- सदर कार्यक्रमासाठी गाव पातळीवरील सर्व कार्यकर्त्यांनी लसीकरण सत्र आणि ग्राम आरोग्य पोषण व स्वच्छता दिन या दिवशी जास्तीत जास्त लाभार्थ्यांचा सहभाग असेल याची दक्षता घ्यावी.

## प्रसिध्दी साहित्य व जनजागृती:-

- सदर कार्यक्रमाची जास्तीत जास्त प्रसिध्दी करण्याची जवाबदारी आपल्या जिल्हा विस्तार व संपर्क अधिकारी, (क्पेजतपबज म्गजमदेपवद - डमकपं वििपबमत) यांची असेल.
- या कार्यक्रमाची सर्वस्तरावर प्रसिध्दी करण्यात यावी. सर्व आरोग्य संस्था, हेल्थ पोस्ट, ओआरटी कॉर्नर, तालुकास्तरावर इत्यादी ठिकाणी प्रसिध्दी साहित्य व प्रोटोकॉलस लावण्यात यावे.
- प्रत्येक गावस्तरावर ओआरएस व झिंकचा वापराबाबत "आरोग्य संरक्षक भिंत" (हेल्थ वॉल) द्वारे पेटींग करुन संदेश दयावेत.
- पोस्टर, बॅनर, एफएम रेडिओ, दूरदर्शन याद्वांरे जास्तीत जास्त जनजागृती करण्यात यावी.
- जिल्हा पातळीवरुन अतिसार नियंत्रण पंधरवडयाच्या ३ दिवस आधी सर्व प्रसिध्दी साहित्य सर्व स्तरावर उपलब्ध करुन देण्यात यावे.

## प्रशिक्षण :-

- जिल्हा स्तरावर ऑनलाईन प्रशिक्षणाच्या माध्यमातुन जिल्हयातील वैद्यकिय अधिकारी व स्टाफनर्स यांना प्रशिक्षित करण्यात यावे.
- वैद्यकिय अधिक्षक, तालुका वैद्यकिय अधिकारी व वैद्यकिय अधिकारी महानगरपालिका यांनी आपल्या मासिक सभेमध्ये आपल्या अंतर्गत असणाऱ्या उर्वरित सर्व वैद्यकिय अधिकारी, स्टाफ नर्स, आरोग्य सहाय्यक व सहाय्यीका, आशा तालुका फॅसिलीटेटर व मोबीलायझर, आयुषचे वैद्यकिय अधिकारी, आरबीएसके पथक व स्टाफ नर्स यांचे एक दिवशाचे प्रशिक्षण मासिक सभेमध्ये घेण्यात येऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यात यावे
- प्राथमिक आरोग्य केंद्र/तालुकास्तरावरील एएनएम व आशा यांचे एक दिवशीय प्रशिक्षण घ्यावयाचे आहे. सदर प्रशिक्षण मासिक बैठकीमध्ये घेण्यात यावे.



Scanned with CamScanner

## संनियंत्रण व मुल्यमापन :-

### जिल्हास्तरीय

- सदर पंधरवडयाचे संनियंत्रण व मुल्यमापन नियमितपणे करण्यात यावे. जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक स्तरावरुन जिल्हयातील प्रत्येक तालुक्याचे संनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी प्रती तालुका एक अधिकारी नियुक्त करावा. जिल्हा सल्लागार, युनिसेफ सुध्दा या कार्यक्रमाचे सनियंत्रण मुल्यमापन करतील.

### तालुकास्तरीय

- कार्यक्षेत्रामध्ये तालुका आरोग्य अधिकारी, तालुका समूहसंघटक, आयुष, तालुका समन्वयकयांनी आशा व एएनएमच्या कामकाजाचे मुल्यमापन व संनियंत्रण करावे.
- प्रत्येक तालुकास्तरावर तालुका आरोग्य अधिकारी, तालुका समूह संघटक, तालुका आरोग्य व्यवस्थापक, वैद्यकिय आरोग्य अधिकारी (आयुष),यांनी क्षेत्रभेटी दयाव्यात. त्यांनी कमीत कमी १०% अंगणवाडया, ओआरटी कॉर्नर व २% ओआरएस वाटप केलेली घरे येथे भेटी देऊन मुल्यमापन करावे.

## अहवाल सादरीकरण :-

- अहवाल पाठविताना संपुर्ण जिल्हयाचा एकत्रित अहवाल न पाठवता DHO Side, CS Side व Corporation Side असा अहवाल पाठविण्यात यावा.
- सोबत जोडलेल्या विहित नमुन्यामध्ये दि. १० ऑगस्ट २०२१ अखेर पर्यंत spm.pune1@gmail.com या ईमेल आयडीवर अहवाल पाठवावा.



Scanned with CamScanner

# अतिसार नियंत्रण पंधरवडा वेळापत्रक

| अ.क्र. | विषय | जबाबदार अधिकारी | कालमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | जिल्हास्तरीय सुकाणू समिती स्थापन करणे | जिल्हा आरोग्य अधिकारी | ६.७.२०२१ |
| २ | जिल्हा नोडल अधिकारीची निवड करणे (कार्यक्रमाकरिता) | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक व महानगरपालिका वैद्यकिय अधिकारी | ६.७.२०२१ |
| ३ | स्टॉक अद्ययावत करणे | नोडल अधिकारी | ७.७.२०२१ |
| ४ | तालुका स्तरीय एक दिवसीय सभा व प्रशिक्षण सत्र | तालुका नोडल अधिकारी | ८.७.२०२१ |
| ५ | प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरीय सभा व प्रशिक्षण सत्र | नोडल अधिकारी | ९.७.२०२१ |
| ६ | ओआरएस व झिंक कॉर्नरची स्थापना | नोडल अधिकारी व संस्थाचे मुख्य अधिकारी | १०.७.२०२१ |
| ७ | विहित नमुन्यांची छपाई | नोडल अधिकारी | १०.७.२०२१ |
| ८ | स्टॉकचे वितरण करणे व सुक्ष्म कृती आराखडा तयार करणे | नोडल अधिकारी | १२.७.२०२१ |
| ९ | संनियंत्रण व मुल्यमापन | नोडल अधिकारी | १५ जुले ते ३० जुलै २०२१ |
| १० | अतिसार नियंत्रण पंधरवडयाचे उद्घाटन | जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा नोडल अधिकारी | १५ जुले, २०२१ |



Scanned with CamScanner

# अतिसाराचे व्यवस्थापन व उपचार

**माहिती घ्या**

✓ किती दिवसांपासुन अतिसार आहे?

---

**लक्षणे -**

✓ सौम्य किंवा गंभीर जलशुष्कतेची कोणतीही लक्षणे नसल्यास

↓

**जलशुष्कता नाही**

↓

**योजना अ प्रमाणे उपचार करा**

✓ आशाद्वारे गृहस्तरावर

---

**लक्षणे (खालील पैकी कोणतीही दोन) -**

✓ अस्वस्थपणा, चिडचिडेपणा

✓ डोळे खोल जाणे

✓ घटाघटा पाणी पिणे, तहानलेला

✓ त्वचेला चिमटा घेतला असता त्वचा हळुहळु पुर्ववत होणे

↓

**सौम्य जलशुष्कता**

↓

**योजना ब प्रमाणे उपचार करा**

✓ एएनएम, सीएचओ द्वारे आरोग्य वर्धीनी केंद्र व गृहस्तरावर

---

**लक्षणे (खालील पैकी कोणतीही दोन)-**

✓ सुस्तावलेला किंवा बेशुध्द पडणे

✓ डोळे खोल जाणे

✓ पीऊ किंवा स्तनपान करु शकत नाही किंवा असमाधानकारक रित्या पीत आहे.

✓ त्वचेला चिमटा घेतला असता त्वचा हळुहळु पुर्ववत होणे

↓

**गंभीर जलशुष्कता (शॉक)**

↓

**योजना क प्रमाणे उपचार करा**

✓ वैद्यकिय अधिकारी, सीएचओ द्वारे आरोग्य वर्धीनी केंद्र व प्रा.आ.केंद्र स्तरावर तसेच स्टाफ नर्स द्वारे आरोग्य संस्थेत



Scanned with CamScanner

# अतिसार व्यवस्थापन व उपचाराबाबत महत्वाचे संदेश

- अतिसार झाल्याबरोबर (एका दिवसामध्ये ३ पेक्षा जास्त वेळा जुलाब होणे ) लगेच ओआरएसचे द्रावण आणि इतर द्रव पदार्थ दया आणि अतिसार थांबेपर्यंत देत राहा.
- अतिसार असलेल्या बालकाला १४ दिवसापर्यंत झिंक गोळी दया.अतिसार होणे थांबले तरी गोळी देत राहा
- अतिसारामध्ये ओआरएस व झिंक देणे हे अतिसारावरील उपचाराची योग्य पध्दती असून अतिसार लवकर बरा होण्यास फायदेशिर आहे.
- बाळाची विष्ठेची लवकर आणि सुरक्षित प्रकारे विल्हेवाट करावी.
- अतिसारा दरम्यान जे बाळ स्तनपान घेत असेल त्याला स्तनपान सुरु ठेवा आणि अतिसारा दरम्यान व नंतरही जास्तीत जास्त स्तनपान दया.
- स्वच्छ हातांनी स्वच्छ व निर्जंतुक पाणी प्या.
- स्वयंपाक करण्यापुर्वी, बालकाला जेवण भरण्यापुर्वी तसेच बालकाची शी स्वच्छ केल्यानंतर आणि बालकाला साफ केल्यानंतर मातेने हात साबणाने स्वच्छ धुवून घ्यावे.
- खालील पैकी कोणतेही लक्षणे आढळल्यास बालकाला आरोग्य कर्मचाऱ्याकडे किंवा संस्थेमध्ये घेऊन जावे.
  - बालक अधिक आजारी होत असेल.
  - स्तनपान करु शकत नसेल.
  - शौचामध्ये रक्त पडत असल्यास.
  - कमी पाणी पित असल्यास.
  - ताप येत असल्यास.
- अतिसाराबाबतच्या सल्ल्यासाठी आशा किंवा एएनएमशी संपर्क साधावा.



Scanned with CamScanner

# चला पाहू या हात कसे धुवावेत

## आमच्या गावामध्ये सर्वांच्या आरोग्याचा मंत्र आहे खास
## जेवणाआधी आणि शौचानंतर साबणाने धुवा स्वच्छ हात



हात ओले करून
हाताला साबण लावा



दोन्ही हातांना एकमेकांवर चोळ
साबणाचा फेस करा



ांना पुढे-मागे, दोन्हीकडे आणि
बोटांच्या मध्यभागी चोळा



बोटांच्या नखांनी
तळहातावर घासा



दोन्ही हात
पाण्याने स्वच्छ धुवा



* जेवणापूर्वी हात न धुता कोणत्याही अन्नपदार्थांना स्पर्श करू नका

* बाळाची शी धुतल्यानंतर, बाळाला स्वच्छ केल्यानंतर हात स्वच्छ धुवा

Scanned with CamScanner